"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

**विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर**

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## अ ह वा ल

कोल्हापूर

**राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन**

शनिवार दि.28.09.2024 रोजी विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर रा.से.योजनेच्या वतीने दि.24.09.2024 हा राष्ट्रीय सेवा योजनेचा 56 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. तानाजी चौगले, संचालक राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी आपले विचार मांडताना म्हटले की, राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होऊन राष्ट्रविकासाबरोबरच सहभागी स्वयंसेवकाचा चारित्र्य व नेतृत्व गुण विकास होतो. आजच्या तरुणाला समाजसेवेचा लढा लागला पाहिजे तरच तो सर्वगुणसंपन्न बनवून देशाचे व आपले मनोबल वाढवू शकतो. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक म्हणून सहभागी होताना या योजनेची ध्येये कोणती आहेत ? या योजनेची उद्दिष्टे कोणती आहेत ? याविषयीचा सविस्तर अभ्यास केल्यानेच आपण या योजनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी, व्यक्तिमत्व विकास व मनाची शुद्धता इत्यादी गुणांचा सर्वतोपरी विकास होऊ शकतो. माणूस घडविण्यासाठी आजच्या युगामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे व्रत धारण करणे अत्यंत आवश्यक आहे. या योजनेत सहभागी विद्यार्थी विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व व चारित्र्य विकासाबरोबरच शिक्षणातून समाजसेवा आणि समाजसेवेतून शिक्षण, आपत्तीग्रस्त स्थितीमध्ये देशातील गरजू माणसांच्या मदतीला धावून जाणे व सर्वतोपरी त्यांची मदत करणे, सामाजिक स्थिती ओळखून योग्य तितका हातभार लावणे गरजेचे आहे. ते विवेकानंद कॉलेज मधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिन समारंभ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख डॉ. आळवेकर हे होते. अध्यक्षीय मनोगतात डॉ.आळवेकर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होऊन श्रमसंस्काराला प्रतिष्ठा देता येते असे विचार मांडले.

या कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून व शिक्षणमहर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. या समारंभाचे स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. श्री. एल एस नाकाडी यांनी केले. कार्यक्रम अधिकारी डॉ.बी. टी.दांगट यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी श्री पी आर बागडे, डॉ.राजश्री पाटील, डॉ.अभिजीत पाटील उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी श्री संदीप पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या बहुमोल मार्गदर्शनातून हा कार्यक्रम यशस्वी झाला. कॉलेजचे रजिस्टार श्री आर बी जोग व शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले. या कार्यक्रमास जूनियर व सीनियर विभागातील स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रा. एल. एस. नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन

दि. 24.09.2024




